SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416004 MAHARASHTRA
Phone:EPBX-2609000 GRAM:UNISHIVAJI, FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर- ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स-२६०९०००, संलग्नता टी-२ विभाग विस्तारित दुरध्वनी-२६०९०९१/९२
संचालक, बीसीयुडी कार्यालय दूरध्वनी (थेट) ०२३१-२६९१६४४
*****
B +
Accredited by NACC

संदर्भ क्र.शिवाजीवि/संलग्नता/टी-२/ No 2 532 दि. 11 JUN 2008

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
वैभव शिक्षण संस्था,
विटा-४१५३११,
ता.खानापूर, जि.सांगली.

विषय - नवीन अध्यापक (बीएड) महाविद्यालय सुरु करण्यास प्राथमिक संलग्नीकरण देण्याबाबत.

संदर्भ - १. एनसीटीई पत्र क्र.WRC/५-६/102nd/2008/29883, दि.०१-०३-२००८ APW ०३७६७४/१२३४५० व
२. महाराष्ट्र शासनाचे क्र.बीएड-मान्यता२००८/(११९/०८)/मशि-१, दि.०८/०५/२००८ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने जून,२००७ पासून विटा, ता.खानापूर येथे नवीन अध्यापक (बीएड) महाविद्यालय सुरु करण्यासाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर न करता थेट एनसीटीई यांच्याकडे सादर केला होता. सदर प्रस्तावास एनसीटीई यांनी त्यांच्या दि.०१-०३-२००८ ने दिलेल्या परवानगीनुसार शासनाने दि.०८/०५/२००८ च्या पत्राने मान्यता दिल्याचे कळविले होते. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन व एनसीटीई यांनी दिलेली मान्यता विचारात घेऊन, आपल्या संस्थेच्या वतीने सुरु करण्यात येणा-या विटा, ता.खानापूर येथील नवीन अध्यापक (बीएड) महाविद्यालयास प्राथमिक संलग्नीकरण देण्याबाबत नेमलेल्या स्थानिक चौकशी समितीने संस्थेस भेट देऊन, अहवाल सादर केला आहे. या अहवालात समितीने नमूद केलेल्या त्रुटीं / अटीं पूर्ततेच्या अधिन राहून तसेच एनसीटीई व महाराष्ट्र शासन यांच्या मंजूरीच्या पत्रामधील नमूद केलेल्या सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून नवीन अध्यापक (बीएड) महाविद्यालयास जून,२००८ पासून सन २००८-०९ या एका शैक्षणिक वर्षासाठी सुरु करण्यास प्राथमिक संलगीकरण देण्यात यावे, अशी शिफारस केली आहे. स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटी खालीलप्रमाणे :

अटी - १) प्राचार्य व सर्व अधिव्याख्याते यांना रितसर विद्यापीठ मान्यता घ्यावी.
२) अर्हताधारक ग्रंथपालाची नियुक्ती करावी.
३) स्टाफ व विद्यार्थी / विद्यार्थीनी यांच्या स्वच्छतागृहांची सोय करावी.
४) महाविद्यालयासाठी एक व्हिडीओ कॅमेरा खरेदी करावा.
५) एक लिपीक व एक चतुर्थश्रेणी कर्मचारी नेमावा.
६) विद्यापीठ नियमाप्रमाणे वैधानिक समित्या गठीत कराव्यात.
७) शिक्षण शुल्क निर्धारण समितीकडून शिक्षणशुल्क निश्चित करुन घ्यावे.

८) बी.एड.पाठ्यक्रमावर आधारीत प्रत्येक पेपरनुसार किमान २० पुस्तक संख्या ठेवावी.
९) इंग्रजी किमान-३, हिंदी किमान-२ ही नियतकालिके मागवावीत.
१०) वार्षिक नियोजन, कार्यभार तक्ता, वेळापत्रक इत्यादींचे नियोजन करावे.

वरीलप्रमाणे समितीने अहवालात अ.क्र.१ ते १० या सर्व त्रूटींची पूर्तता व एनसीटीई व महाराष्ट्र शासन यांच्या मंजूरीच्या पत्रात घातलेल्या सर्व अटींची पूर्तता तात्काळ एक महिन्याच्या आत पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल विद्यापीठाकडे सत्वर सादर करावा. तसेच स्थानिक चौकशी समितीने अहवालात नमूद केलेल्या अटी, एनसीटीई व महाराष्ट्र शासन यांच्या मंजूरीच्या पत्रात घातलेल्या सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून, सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक संलग्नीकरण देण्यात आले आहे. या सर्व अटींच्या पूर्ततेनंतरच संलग्नीकरणास अंतिम मान्यता दिली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. अटींची पूर्तता तात्काळ करुन, तसा अहवाल विद्यापीठाकडे सत्वर सादर करावा.

आपला विश्वासू,

( डॉ. ए.ए. डांगे )
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर.

प्रत :- माहितीसाठी रवाना -

१. मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.
३. मा.शिक्षण सहसंचालक, (उ.शि.), कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर-४१६००४.
४. परीक्षक नियुक्ती विभागास, ५. प्रश्नपत्रिका वितरण विभागास, ६.इतर परीक्षा विभाग-३, ७. जनरल बिल्स/नगदी विभागास, ८.पात्रता विभागास, ९. अभ्यास मंळडे विभागास १०. नॅक विभागास, ११. बीसीयुडी विभागास, १२. संलग्नता/टी-१ विभागास, १३. संलग्नता टी-२ - संबंधित टेबल १४. गुदाम (गोडावून) विभागास -
- यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

....